# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.12.2025** **वार:शनिवार**

1. येत्या पाच वर्षात आर्थिक सहकार्य वाढवण्यावर भारत आणि रशियामध्ये सहमती
2. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरामध्ये पाव टक्का कपात
3. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखों अनुयायी चैत्यभूमीवर दाखल आणि
4. इंडिगो कंपनीच्या विस्कळीत विमानसेवेमुळे निर्माण झालेली परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सरकारकडून हस्तक्षेप

**रशिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात नवी दिल्लीतल्या हैद्राबाद हाऊसमध्ये झालेल्या 23व्या वार्षिक शिखर संमेलनात संरक्षण, व्यापार, ऊर्जा, आरोग्य, शिक्षण आणि माध्यम क्षेत्रातील सहकार्यासाठी महत्त्वाचे करार करण्यात आले. भारताला इंधनाचा अखंड पुरवठा करण्याची, तसंच ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याची तयारीही रशियानं दाखवली. आर्थिक आणि व्यापारी भागीदारी आणखी बळकट करण्यासाठी भारत आणि रशियादरम्यान 2030 पर्यंतच्या आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर यावेळी सहमती झाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2030 पर्यंतचा संयुक्त वित्तीय सहकार्य आराखडा जाहीर केला. भारत-रशिया दरम्यानचा द्विपक्षीय व्यापार 2030 पूर्वीच 100 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला. या सहकार्याचा परिणाम म्हणून भारत-रशिया मैत्री आणखी मजबूत होणार असल्याचं प्रतिपादन मोदी यांनी केलं....

**भारत–रूस मित्रता एक ध्रुव तारे की तरह बनी रही है।परस्पर सम्मान और गहरे विश्वास पर टिके ये संबंध समय की हर कसौटी पर हमेशा खरे उतरे हैं। आर्थिक सहयोग को नई ऊँचाइयों पर ले जाना हमारी साझा प्राथमिकता है। इसे साकार करने के लिए आज हमने 2030 तक के लिए एक Economic Cooperation प्रोग्राम पर सहमति बनाई है। इससे हमारा व्यापार और निवेश Diversified, Balanced, और Sustainable बनेगा, और सहयोग के क्षेत्रों में नए आयाम भी जुड़ेंगे।**

**संसद**

पानमसाला उत्पादन करणाऱ्या केंद्रांवर अधिभार लावण्यासाठीचं विधेयक काल लोकसभेनं मंजूर केलं. यातून मिळणारा निधी राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि नागरिकांचं आरोग्य सुधारण्यासाठी वापरला जाणार आहे. हानीकारक वस्तूंचा वापर कमी करायचा सरकारचा मानस असून आरोग्य हा राज्य सूचीतला विषय असल्यानं या अधिभाराची रक्कम राज्यांनाही दिली जाईल, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान दिली.

**रेपोदर**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरामध्ये पाव टक्का कपात केली आहे. यामुळे आता रेपो दर सव्वा पाच टक्के झाला आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी काल ही घोषणा केली. ही व्याजदर कपात; महागाईचा कमी झालेला दर आणि वाढलेली मागणी यांच्या आधारावर केल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. यामुळे गृहनिर्माण, वाहन आणि व्यावसायिक कर्जांसह विविध कर्ज स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. गेल्या तिमाहीत आर्थिक वृद्धीदरात झालेली वाढ, जीएसटीतली कपात, सणासुदीच्या काळात नागरिकांनी केलेली खरेदी यामुळे देशाचा आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 3 दशांश टक्के राहील असा अंदाज बँकेनं व्यक्त केला. दोन महिन्यापूर्वी

हा दर 6 पूर्णांक 8 दशांश टक्के राहील असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं. सलग दुसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं जीडीपीच्या अंदाजात सुधारणा केली आहे.

**सर्वोच्च न्यायालय**

राज्यात 2 डिसेंबर रोजी झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी 21 डिसेंबरलाच होईल, त्याआधी नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं काल स्पष्ट केलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुका 31 जानेवारी 2026 पर्यंत पूर्ण करणं बंधनकारक असून कोणत्याही परिस्थितीत त्या पुढे ढकलल्या जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देशही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं दिले.

**महापरिनिर्वाण दिन**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरमधील चैत्यभूमीवर मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत. या अनुयायांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेनं पिण्याचं पाणी, स्वच्छतागृह याबरोबरच विविध अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ऐकुया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**शिवाजी पार्क इथं एक लाख चौरस फूट क्षेत्रफळावर वॉटरप्रूफ निवासी मंडपाचे सोय केली आहे. ज्यात अनुयायांना तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्थाही आहे. निवासी मंडपात दहा ठिकाणी मोठे एल ई डी स्क्रीन लावण्यात आले आहेत, त्यात अभिवादनाचे थेट प्रक्षेपण केले जात आहे. तसेच राजगृह इथं नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्षही स्थापन करण्यात आला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे फिरते कॅमेरे मेटल डिटेक्टर आदीची व्यवस्था करण्यात आली आहे. चैत्यभूमीपुढे नतमस्तक होण्यासाठी आंबेडकरी अनुयायांच्या लाटा आज सकाळपासूनच चैत्यभूमीवर धडकत आहेत. अतिरिक्त महापालिका आयुक्त डॉक्टर अश्विनी जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी पार्क इथं दीपस्तंभ या माहिती पुस्तिकेचं प्रकाशन करण्यात आलं. आकाशवाणी बातम्यांसाठी विष्णू सोनावणे मुंबई**

**सौर कृषीपंप**

राज्य सरकार कृषीक्षेत्रात आमुलाग्र बदल करत असून, येत्या काही वर्षांत त्याचे परिणाम दिसून येतील, असा विश्वास, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. 'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेत राज्यानं केलेल्या विश्वविक्रमाचा प्रमाणपत्र प्रदान सोहळा काल छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. या विश्वविक्रमात मराठवाड्याचं विशेषत: छत्रपती संभाजीनगरचं योगदान लक्षणीय असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री**

शासकीय सेवेत अनाथ मुलांना आरक्षण देण्याच्या निर्णयामुळे 862 अनाथ युवक-युवती स्वावलंबी होऊन समाजासाठी कार्यरत झाले, याचं समाधान आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी काल केलं. राज्य सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी मुंबईत अनाथ मुलांशी संवाद साधला. संघर्षातून पुढे आलेले हे युवक समाजासाठी आदर्श बनावेत, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

**महायुती-वर्षपूर्ती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारनं वर्षभरात राज्याला शाश्वत विकासाच्या दिशेनं नेलं आहे, असं प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल केलं. राज्यातल्या महायुती सरकारला एक वर्ष पूर्ण झालं, त्यानिमित्तानं मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

राज्यातल्या महायुती सरकारची वर्षपूर्ती झाली तरी जनतेच्या पदरी मात्र निराशाच पडली आहे, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी काल नागपुरात केली. सरकारनं हिवाळी अधिवेशनात एक वर्षाच्या कामाची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

**बालविवाह**

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या वतीनं बालविवाहमुक्त भारतासाठी 100 दिवसांची जागरुकता मोहीम नुकतीच सुरू झाली आहे. या अंतर्गत पुण्यात होत असलेल्या उपक्रमाबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**बाल विवाह मुक्त भारत अभियानाची सुरुवात पुणे जिल्ह्यातही झाली असून पुरंदर तालुक्यात 25 गावांमध्ये हे अभियान राबवलं जात आहे. यात ग्रामपंचायत आणि शाळांच्या मदतीने जनजागृती केली जात आहे. या अभियानामध्ये पथनाट्य, पदफेरी, चर्चासत्रे, पॉपेट शो, लघुपट यांच्या माध्यमातून बालविवाहाचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवले जाणार आहेत. ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, पोलीस यांसारख्या स्थानिक घटकांना एकत्र आणून अभियान राबवण्यात येणार आहेत. त्यात सामान्य नागरिकांनाही सहभागी होता येणार आहे. केंद्र सरकारने 2030 पर्यंत बालविवाह निर्मूलनाचे उद्दिष्ट समोर ठेवून हे अभियान सुरु केलं असून या अभियानात सहभागी होण्यासाठी संबंधित जिल्हा महिला आणि बाल विकास विभाग किंवा बाल संरक्षण कक्ष यांच्याशी संपर्क साधावा असं आवाहन प्रशासनाने केलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरु, पुणे.**

**इंडिगो**

इंडिगो कंपनीच्या विस्कळीत विमानसेवेमुळे निर्माण झालेली परिस्थिती लवकरच नियंत्रणात येऊन परिस्थिती सामान्य होण्याची अपेक्षा आहे. येत्या तीन दिवसांत विमानसेवा पूर्वपदावर येईल, असं नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं म्हटलं आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयांचे आयुक्त, नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इंडिगोच्या अधिकाऱ्यांसोबत काल आढावा बैठक घेतली. विमान सेवा कालमर्यादेचा आदेश नागरी विमान वाहतूक संचालनालयानं तात्काळ प्रभावानं स्थगित केला आहे. हवाई सुरक्षेशी कोणतीही तडजोड न करता ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण आणि अत्यावश्यक कारणांसाठी विमानसेवेवर अवलंबून असणाऱ्यांच्या हितासाठी हा निर्णय घेतल्याचं मंत्रालयानं सांगितलं आहे. यासर्व प्रकाराची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारनं एक उच्चस्तरीय चौकशी समितीही स्थापन केली आहे. इंडिगोची 1 हजाराहून अधिक विमान गेले दोन दिवस रद्द झाली होती. दरम्यान उड्डाण रद्द केलेल्या विमानातल्या सर्व प्रवाशांना पूर्ण पैसे तत्काळ परत करा, असे आदेश सरकारनं इंडिगोला दिले आहेत.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र कोरडं हवामान असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.